**दिनांक २८.०८.२०२५ रोजी–**

**<u>अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१ श्री. प्रभाकर नामदेव सरग यांचा उलटतपास शपथेवर सुरू</u>**
**<u>आरोपी पक्ष क्र.१ ते ३ यांचे करीता विद्वान श्री. मंचेरीअल एस.एन, विधीज्ञ यांचे द्वारा –</u>**

**१२**. हे म्हणणे खरे आहे की, मी, पोलीसांना फिर्याद देतांना ऑरेंज सिटी बेस्ट प्राईडच्या पाठीमागे, पैठणरोड औरंगाबाद येथे राहतो असे सांगीतले होते.हे म्हणणे खरे आहे की, मी मा. न्यायालयात कोतवालपुरा येथे राहतो असे सांगीतले आहे. मी बेशुध्द पडल्यानंतर शुद्धीवर लगेच आलो. हे म्हणणे खरे आहे की, कोतवालपुरा भागात आजुबाजुला पुष्कळ घरे आहेत व बरेच लोक तेथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, श्री. कैलास पोटे हे मी ज्या खानावळीत जेवण करतो त्याचे मालक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार श्री. अलीम हे माझ्या मुलाचे वाहन चालक आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्री. सुरेश व्यवहारे हे माझ्या मुलाचे घरी काम करणारा नौकर आहे. हे मला माहीत नाही की, घटनेच्या वेळेला हे तीन चार लोक सोडुन अन्य कोणी लोक भांडण सोडवायला आले किंवा नाही. माझे मार लागल्या बद्दलचे काही फोटोग्राफस वगैरे काही काढलेले नाहीत. हे मला माहीत नाही की, उजव्या खांद्यावर मारहाण झाल्यास डावा खांदा फॅक्चर होईल.

**१३**. हे मला माहीत नाही की, व्हीडीओ कोणी रेकॉर्ड केला. श्री. भोसले यांनी सदर व्हीडीओची क्लीप त्यांनी माझ्याकडे दिली. मला ही व्हीडीओ क्लीप श्री. भोसले यांच्या मोबाईलवरून माझ्या मोबाईल फोनवर मिळाली. मी रेडमी कंपनीचा मोबाइल वापरतो. मी तो मोबाईल पोलीसांकडे जमा नाही केला. मोबाईल मधील क्लीप डीव्हीडीमध्ये कोणी रेकॉर्ड करून दिली हे मला सांगता येणार नाही. व्हीडीओमध्ये दिसत असलेला व्यक्ती श्री. सखाराम मिस्तरी नारंगी शर्ट असलेला व्यक्ती ही साक्षीदार म्हणून आहे. हे मला मला माहीत नाही की, ही व्हीडीओ क्लीप ज्या सीसीटीव्ही कॅमे–यातून रेकॉर्ड झाली तो कॅमेरा कुठ बसविलेला आहे याबाबत मी फोटोग्राफ्स दाखल केलेले नाहीत. हे मला माहीत नाही की, हा व्हीडीओ क्लीप ०१ मिनीट ३६ सेकंदाचा आहे. हे मला माहीत नाही की, फक्त ०१ मिनीट ३६ सेकंदाचा व्हीडीओ पुढे कोणतेही रेकॉर्ड नाही अथवा मागेही कोणतेही रेकॉर्ड नाही असा कोणता सीसीटीव्ही कॅमेरा आहे. हे मला सांगता येणार नाही की, मी हा ०१ मिनीट ३६ सेकंदाचा व्हीडीओ माझ्या मोबाईलवर छायाकिंत केला. हे म्हणणे खरे नाही की, मी हा दिसणारा व्हीडीओ माझ्या मोबाईलवर एडीट करून तयार केलेला आहे. पोलीसांनी डीव्हीआर जप्त केला किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. मी चार्जशीट पाहिलेली नाही. माझ्या मोबाईल मध्ये हा व्हीडीओ आत्ता नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे कोणताही असा पुरावा नाही की, हा व्हीडीओ प्रत्यक्ष घटनेप्रमाणे रेकॉर्ड करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे मुळ व्हीडीओच नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मा. न्यायालयासमक्ष खोटी साक्ष दिलेली आहे.

**<u>उलटतपास- संपला.</u>**
**<u>फेरतपास- काही नाही.</u>**

<u>समक्ष</u>
-/स्वाक्षरीत/-
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
<u>दिनांक- २८/०८/२०२५</u>

<u>श्रवणोत्तर स्वीकृती.</u>
-/स्वाक्षरीत/-
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद